<u>**राजाधिराज योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराजांचा पोवाडा...**</u>

**आधी नमू शारदापती । द्यावी मज मती । गातो तव कीर्ती ।**
**मुजरा हा सकल रसिक जनास ।**
**नमितो कुलस्वामिनीच्या चरणास ।**
**दंडवत योगीराजा चरणास ॥जी॥**

**नमितो आधी मात्या पित्याला । सद्गुरू चरणाला |रेणुकामातेला ।**
**जय जगदंब अंब बोला । हर हर महादेव बोला।जयजय दिगंबर बोला ।**
**हरीहरानंदनाथ मूर्तीला ॥ जी ॥**

**क्षेत्र सोनई गावात । वसे साक्षात । हर आदिनाथ ।**
**सोनेश्वराने कृपा केली ।**
**ओमभटांच्या वंशा आली ।**
**साक्षात रेणुकाई माऊली ॥जी॥**

**गुरू सिध्दनाथ कृपेनं । भगवती आज्ञेनं । नाथ परंपरेनं ।**
**कृष्णानंद राधाईच्या पोटी ।**
**जन्मली तेजस्वी मूर्ती ।**
**असे योगीराज ज्यांची ख्याती ॥जी॥**

**पाळणा -**
**याग सुवासिनी साजणी या । गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या ।**
**जगदंब पाळणा भक्तीची दोरी । झेप द्या काश्मीर कन्याकुमारी ।**
**सई सटवाई लीला अवतारी । रेणुकाईची भक्ती ही न्यारी ।**
**माता राधाईची सुईन शिवाई |देवीच्या नावाचा योगी हा घ्या ॥**
**गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या.....॥**

चाल -

असा बालकृष्ण हा हरी । भूमि लोकावरी । कल्याणकारी ।
दाखवी दैवी लीला चमत्कार । सगुण हा देवाचा अवतार ।
भक्त कल्याणाचा हा सार ॥जी॥

चाल -

दिवसामासी बाळ वाढला ग्रहन करी ज्ञान ।
मात्या पित्याच्या आनंदान मिळवी तो मान ॥जी॥

मूर्तीकला, संगीत साधना आवडे ज्याला ध्यान ।
रेणुकाईच्या सेवेत सदा तो राही ध्यान मग्न ॥ जी ॥

वेद, शास्त्र, ग्रंथ, पुराण यांचे अध्ययन ।
मंत्र साधना, ध्यानधारणा सेवा परिपूर्ण ॥ जी ॥

भगवती रेणुका माऊलीची सेवा करीत असताना परमपूज्य माता ब्रह्मीभूत प्रेमानंदीनाथ माऊली म्हणजेच स्वामींची प्रिय रमा यांचे स्थळ स्वामींसाठी चालून आले आणि त्यांचा विवाह सोहळा थाटामाटात पार पडला... आणि दोघेही प्रपंच करता अध्यात्म करू लागले....

चाल -

धन्य धन्य प्रेमानंदी माऊली । भक्ताची वाली । झाली सावली ।
भगवती सेवेमध्ये रममाण ।
पतिव्रता साध्वी ती महान ।
मिळविला प्रेमानंदीचा मान ॥ जी ॥

चाल -

प्रेमानंदीची साथ मिळवूनी केली पूर्ण भक्ती ।
शिवशक्तीचा वर मिळवूनी झाली ज्ञान प्राप्ती ॥

हरीप्रेमांकुर रुजवा हृदयी होई मोक्षप्राप्ती ।
तव चरणांचे गुण गाण्या मिळो मज स्फूर्ती ॥

गातो शाहीर भक्ती पोवाडा जगदंब म्हणोनी ।
तव चरणांचा दास अजिंक्य माथा नमवूनी ॥

चाल -

जयजयकार महाराष्ट्राचा ।जगदंबेचा ।योगीराजाचा ।
भक्ती सळसळते रोमारोमात ।
गातो शाहीर अभिमानात ।
मुजरा तुम्हा करतो स्वाभिमानात ॥जी ॥

स्वातंत्र्याच्या रक्षणाला झाले तयार मावळे झाले तयार ।
हर हर महादेव झाली गर्जना ।
जय जगदंब झाली गर्जना ।
झाले अमर ॥जी ॥

रचनाकार
दास - शाहीर अजिंक्य सुरेश लिंगायत
गुरुपोर्णिमा - ०३ जुलै २०२३